16-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 15-06-2025 21:52 Page 1



# संयमी, शुद्ध दृष्टीने परंपरेचा वेध घेणारे पुस्तक

## प्राचार्य अनिल सामंत 'सृजनाकडून सर्जनशीलतेचा प्रवास' पुस्तकाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** 'सृजनाकडून सर्जनशीलतेचा प्रवास'या संशोधनात्मक पुस्तकातून केवळ माहिती नाही तर वेगळे अन्वयार्थ लावता येणारे न कळलेले संदर्भ आहेत. नव्याने साहित्य संशोधन करणाऱ्यांना यात नवनवीन विषय सापडतील. साक्षेपी, संयमी, शुद्ध दृष्टीने परंपरेचा वेध घेणारे हे मौलिक पुस्तक आहे, असे मत गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष तथा समीक्षक प्राचार्य अनिल सामंत यांनी येथे केले.

सव्यसाची साहित्यिक तथा संशोधक डॉ. स्नेहा सुवास महांबरे यांच्या 'सृजनाकडून सर्जनशीलतेचा प्रवास' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी शुभश्री प्रकाशन सांगोल्डा व इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा (आयएमबी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयएमबी च्या प्राचार्य अनिल सामंत यांच्या हस्ते परिषदगृहात झाले त्यावेळी अध्यक्षस्थानावावरून ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ते दैनिक नवप्रभा चे संपादक परेश प्रभू, सन्माननीय पाहुणे आयएमबी चे सदस्य सचिव अशोक परब व डॉ. स्नेहा महांबरे उपस्थित होत्या. या पुस्तकातील लेख संशोधनपर असले तरी बऱ्याच लेखात ललित लेखनाची शैली असल्याने ते अधिक वाचनीय झाले आहेत असे सांगून प्राचार्य सामंत म्हणाले, गोव्याचा इतिहास पाठ्यपुस्तकात योग्य पद्धतीने आलेला नाही अशा वेळी हे पुस्तक माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात समाविष्ट करणे उचित ठरेल. परेश प्रभू म्हणाले, गोव्याची भाषा, संस्कृती यादृष्टीने गोव्याकडे बघण्याचा वेगळा दृष्टीकोन देणारे हे मौलिक पुस्तक संशोधनाच्या पायावर उभे आहे. त्याला अभ्यासपूर्ण बैठक आहे. नवे संदर्भ,विचार सूत्र त्यात आहेत. यात वेगवेगळे आयाम मांडलेत. इतिहासाकडे बघण्याचा वेगळा दृष्टीकोन यातील निबंधातून मिळतो. परकीय राजवटीत गोव्याची संस्कृती मराठी भाषेमुळे टिकली हे या पुस्तकात अधोरेखित केले आहे. गोव्याच्या संदर्भातील अनवट विषय, ज्याचा वाटेला सहसा कोणी जात नाही ते विषय सखोल संशोधन करून डॉ. महांबरे यांनी मांडले असल्याचे सांगून परेश प्रभू यांनी, यांनी यातील निबंधाचा एकेका विषयावर स्वतंत्र पुस्तक होऊ शकते असे नमूद केले व महांबरे या गोव्याची वेगळी ओळख दर्शविण्यासाठी, गोव्याच्या सांस्कृतिक वांड.मयीन राजदूत म्हणून काम करत आहेत असा गौरवाने उल्लेख केला. डॉ. स्नेहा महांबरे म्हणाल्या, मी संशोधनातून नवीन शोधण्याचा प्रयत्न करत गेले. गोव्याला एक अभिमानास्पद संस्कृती आहे हे पटविण्याचा माझा प्रयत्न राहिला आहे. मनन, चिंतन, धारणेतून हे पुस्तक साकार झाले आहे. गोव्याचा भूभाग, येथील माणसे, विविध क्षेत्रातील त्यांचे वेगळेपण याचा हा आलेख आहे. अशोक परब यांनी लेखिकेला शुभेच्छा दिल्या. डॉ. सची महांबरे शणई, सिद्धी महांबरे व सुवास महांबरे यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देवून त्यांचा सन्मान केला. चित्रा क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.



पणजी : 'सृजनाकडून सर्जनशीलतेचा प्रवास' पुस्तकाचे प्रकाशन करतांना प्राचार्य अनिल सामंत सोबत चित्रा क्षीरसागर, डॉ. स्नेहा महांबरे, परेश प्रभू व अशोक परब.

# डिचोली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी देविदास जांभळे

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** डिचोली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची सर्वसाधारण सभा शनिवारी १४ रोजी सायंकाळी डिचोली नवा बाजार छत्रपती शिवाजी महाराज संकुल इमारत सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. गणेशोत्सव २०२५ साठी मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते देवीदास जांभळे यांची निवड करण्यात आली आहे. सचिवपदी राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ नाट्यकर्मी नरेश कडकडे तर खजिनदारपदी प्रा. दिलीप धारगळकर यांची एकमताने निवड करण्यात आली.मावळते अध्यक्ष प्रा. डॉ. सत्यवान हरमलकर,सचिव देविदास जांभळे, खजिनदार शिवराम (आना) फळारी, देणगी कूपन विक्री प्रमुख प्रा. दिलीप धारगळकर आदिंची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या वेळी मागच्या वर्षीच्या गणेशोत्सवाच्या जमा खर्चाला मंजुरी देण्यात आली. तसेच अन्य विषयांवर चर्चा करण्यात आली. देणगी कूपन विक्रीतून मंडळाला ७ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती खजिनदार शिवराम फळारी यांनी या वेळी दिली. याबद्दल देणगी कूपन प्रमुख प्रा. दिलीप धारगळकर व इतर सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले.

अत्यंत शांततेत आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या बैठकीत गोवा राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ नाट्यकर्मी नरेश कडकडे,बाबी पळ,रामानंद नाटेकर,प्रसाद नाटेकर, नारायण बेतकीकर, गोकुळदास हरमलकर, प्रा. विठ्ठल वेर्णेकर, वितेंद्र गोवेकर, ॲड वल्लभ फळारी, गौरव, सुशांत पेडणेकर, गजानन डांगी, दुर्गादास, महेश गोवेकर,समीर, अरुण, सोमा धारगळकर, शाम मातोणकर, श्रीपाद कुंभारजुवेकर, पप्पू फळारी, तुषार फळारी व इतर सदस्यांनी भाग घेतला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून यासाठी विविध उपासमित्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच पुढील बैठकीची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.



डिचोली : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ नूतन अध्यक्ष देविदास जांभळे. बाजूला नरेश कडकडे, प्रा. दिलीप धारगळकर, इतर पदाधिकारी व सदस्य

# मांगिरिष विद्यालयात पालक शिक्षक संघाची बैठक



शिरगाळ–आरोबा : बैठकीत उपस्थित मुख्याध्यापिका गौरी वेर्लेकर, उदय मांद्रेकर, रेश्मा नाईक, आनंदी परब, माया मराठे, सारिका मुरारी व उत्तम शर्मा.

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १५ :** शिरगाळ–आरोबा येथील मांगिरिष विद्यालयाच्या पालक शिक्षक संघाची सभा शनिवारी १४ जून २०२५ रोजी, १०.३० वाजता घेण्यात आली. या सभेत विद्यालयाची मुख्याध्यापिका गौरी वेर्लेकर, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष उदय मांद्रेकर, उपाध्यक्ष रेश्मा नाईक, खजिनदार आनंदी परब व पालक शिक्षक संघाचे इतर सदस्य माया मराठे, सारिका मुरारी व उत्तम शर्मा, पालकवर्ग व शिक्षक या सभेला उपस्थित होते.

पालक शिक्षक संघाची संयुक्त सचिव शिक्षिका अंकिता पेडणेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून सर्वांचे स्वागत केले. या सभेस खास अतिथी म्हणून लाभलेले पेडणे पोलीस दलातील सहायक पोलिस उपनिरीक्षक यशवंत दावरे, हेड कॉन्स्टेबल संतोष गवंडी व हवालदार संतोष कोरगांवकर यांनी पालकांना रोड सेफ्टी या विषयावर माहिती व सल्ले दिले.सचिव जास्मिन दोडामनी यांनी विषय पत्रिका मांडून २०२४–२०२५ या वर्षाचा अहवाल सादर केला. मुख्याध्यापिका सौ गौरी वेर्लेकर यांनी पालकांना योग्य मार्गदर्शन केले.तसेच अध्यक्ष उदय मांद्रेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालयाची समुपदेशक हिना हळदणकर यांनी पालकांना मुलांच्या योग्य पोषणा विषयी माहिती दिली. या वर्षी पालक शिक्षक संघात योगिता साळगांवकर व निवेदा मांद्रेकर या २ नवीन सदस्यांची निवडणूक करण्यात आली.शिक्षक दिगंबर नाईक यांनी सभेचे आभार प्रदर्शन केले.

# खोतीगावतील १५० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १५ :** काणकोण नगरपालिकेचे नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी श्री रवी चॅरिटेबल ट्रस्टच्या सदस्यांसह खोतीगाव गावातील १५० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वितरण खोतिगाव पंचायत परिसरातील सभागृहात केले.

पार्वती परिवार खोतीगाव आणि आदिवासी महिला बचत गट खोतीगाव यांनी आयोजित केलेल्या रोप वितरण कार्यक्रम आणि लाभांश वितरण कार्यक्रमाला खोतिगावचे माजी सरपंच उमेश गावकर उर्फ दया, सुनय कोमरपंत आणि इतर मान्यवरांसह प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक शुभम कोमरपंत उपस्थित होते.




# सोणेये तूये येथे २१ रोजी योग दिवस

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १५ :** श्री ब्राम्हण स्थळ सोणये तुये येथिल ब्राम्हण मंडपमध्ये शनिवार दि. २१ रोजी योग दिवसा निमित्त सकाळी ६.३० ते ७.३० व संध्याकाळी ५.३० ते ६.३० या दोन सत्रांमध्ये योगासन सराव होणार आहे.

या मध्ये भाग घेण्या साठी वयाची अट नाही १२ ते त्या पेक्षा जास्तही वयस्कर पोचलेली व्यक्ती सुद्धा भाग घेवू शकते. फक्त आधाराशिवाय जमनिवर बसतां उठता आलं पाहिजे. जागा मर्यादित असल्याने दूर ध्वनीवर ९३७०४९५३७५ शुक्रवार दि. २० जून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत संपर्क साधावा.

पान १ वरून

## कोलवा सांडपाणी पंपिंग स्टेशनमध्ये बिघाड 'जैसे थे'

त्यांनी या समस्येची तुलना मडगावमधील त्रासदायक एसटीपी प्रकल्पाशी करत, सरकारच्या प्राथमिकतांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पर्यटनाचा गाजावाजा आणि सांडपाण्याची दुर्गंधी हे एकत्र शक्य नाही, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद करत प्रशासनाच्या जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित केले. सीसीसीएफ ने या अपयशी सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, अपयशास कारणीभूत ठरलेल्या अधिकाऱ्यांवर आर्थिक नुकसानभरपाईची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. संपूर्ण सांडपाणी यंत्रणेची स्वतंत्र तांत्रिक तपासणी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई केली जावी, अशी जोरदार मागणी सीसीसीएफ ने केली आहे. स्थानिक नागरिकांनीही पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने त्वरित सुधारात्मक पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

या बिघाडामुळे शेतजमिनी प्रदूषित होण्याचा धोका निर्माण झाला असून, भूगर्भजल स्रोतांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. स्थानिकांनी यासंदर्भात आवाज उठवायला सुरुवात केली असून, सांडपाणी साठवण्याच्या जागी शेतात पाणी सोडणे ही केवळ निष्काळजीपणाची परिसीमा आहे,असे एका शेतकऱ्याने सांगितले. या घटनांमुळे, पर्यटन हंगामाच्या तोंडावर कोलवा स्वच्छतेच्या आणि सुरक्षिततेच्या प्रतिमेला मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देत, कारवाई न केल्यास कायदेशीर लढाईचा इशारा स्थानिक संघटनांनी दिला आहे. कोलवा तील ही समस्या ही केवळ एका गावापुरती मर्यादित नसून, संपूर्ण राज्यातील सांडपाणी व्यवस्थापनाच्या ढासळत्या व्यवस्थेचे प्रतीक ठरत आहे. पर्यटन आणि सार्वजनिक आरोग्य दोन्ही बाबींसाठी महत्त्वाचे असलेले सांडपाणी व्यवस्थापन जर वेळेत सुधारले गेले नाही, तर गोव्यासारख्या संवेदनशील राज्याला मोठ्या पर्यावरणीय संकटाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही पर्यावरण कार्यकर्त्यांनी दिला आहे.

---

## 'सर आली धावून.. रस्ते गेले वाहून..'

स्मार्ट सिटी योजनेतील दस्तऐवजांनुसार, केवळ डांबर नव्हे तर कॉँक्रीट किंवा इतर दीर्घकालीन टिकणाऱ्या सामग्रीचा वापर करणे अनिवार्य होते. रस्त्याचे जीवनमान वाढवण्यासाठी आणि वारंवार दुरुस्ती टाळण्यासाठी हे आवश्यक मानले गेले होते. पण प्रत्यक्षात वापरलेली सामग्री आणि कामाचा दर्जा बघता, या निकषांचे पालन झाले आहे असे वाटत नाही.

पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्याने वाहनधारकांना त्रास होत आहे. स्मार्ट ड्रेनेज यंत्रणा आणि जल व्यवस्थापनाची आश्वासने दिली गेली होती, पण प्रत्यक्षात त्याचा ठावठिकाणा नाही. परिणामी, नव्याने उभे राहिलेले रस्तेही अल्पकालीन ठरत आहेत.

रस्त्याच्या या स्थितीबद्दल स्थानिकांनी नागरी प्रशासन आणि ' इमॅजिन पणजी ' कडे चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. अपारदर्शक टेंडर प्रक्रिया, निकृष्ट काम करणारे ठेकेदार, आणि देखरेखीत हलगर्जीपणा याकडे वारंवार बोट दाखवले जात आहे. स्मार्ट सिटीसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प जर फक्त कागदावरच राहणार असतील, तर त्यांची उपयुक्तता काय, असा प्रश्न उभा राहतो. नागरिकांचा कर भरून तयार होणाऱ्या योजनेत अशी कामे विश्वासघात वाटू लागतात.

---

## इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला; २ ठार, ३२ जखमी, ६ गंभीर

या दुर्घटनेची सखोल चौकशी केली जाईल आणि जर देखभालीबाबत दुर्लक्ष झाले असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवरून या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आणि जखमींना तात्काळ वैद्यकीय मदत पुरवण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या असून, बचाव व मदतकार्य जलद गतीने सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या दुर्घटनेनंतर महाराष्ट्रातील जुने पूल, पर्यटनस्थळे आणि पायाभूत सुविधा यांचा पुन्हा एकदा आढावा घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. नागरिकांनीही प्रशासनाकडून अधिक पारदर्शकता आणि सतर्कतेची मागणी केली आहे. दुर्घटनेची चौकशी सखोलपणे केली गेली आणि दोषींवर योग्य ती कारवाई झाली, तर अशा दुर्घटना भविष्यात टाळता येऊ शकतात, असा सूर नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# शिक्षणाबरोबर कौशल्य विकसित करणे गरजेचे

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत साखळीत करिअर मेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** आजचा काळ हा कौशल्य विकास शिक्षणाचा काळ असून भविष्यात गोवा राज्यात मोठ्या प्रमाणात सर्व क्षेत्रातील कुशल उमेदवारांची गरज भासणार आहे. त्या पद्धतीची रोजगार निर्मिती गोव्यात होणार असून विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाबरोबरच कौशल विकास कोर्सेसही करावे. जेणेकरून एकाच वेळी दोन्ही अभ्यासक्रम ग्रहण केल्याने लवकरच रोजगार प्राप्त होण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होणार, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले.

साखळी येथील साई नर्सिंग इन्स्टिट्यूट या कॉलेजमध्ये गोवा कौशल्य व प्रशिक्षण संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या करिअर मेळाव्यास भेट दिल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. या करियर मेळाव्यात उपस्थित तज्ञ प्रशिक्षकांकडून बारावीनंतर विद्यार्थ्यांना कोणत्या मार्गाने शिक्षण घ्यावे, तसेच आजच्या घडीला कोणते शिक्षण लवकर रोजगार प्राप्तीसाठी फायदेशीर ठरू शकते. याबाबत समुपदेशन करण्यात आले. या करिअर मेळाव्यास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी भेट देऊन सर्व तज्ञ प्रशिक्षकांशी संवाद साधला.

या करिअर मेळाव्या संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आज गोव्यातील गरज काय आहे, याची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे आवश्यक बनले आहेत. केवळ बारावी व पंधरावी पर्यंतचे शिक्षण घेऊन नंतर कोणता तरी कौशल्य विकासाचा अभ्यासक्रम शिकण्यास जाण्यापेक्षा बारावीनंतरच अशा पद्धतीचे अभ्यासक्रम निवडून आपल्या भविष्याला लवकरच एक दिशा देण्याची संधी गोव्यातील विद्यार्थ्यांकडे आहे. कारण येणाऱ्या काळात गोव्यात प्रत्येक क्षेत्रांमध्ये कुशल उमेदवारांची गरज भासणार आहे. त्यासाठी कौशल्य प्रधान शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनीही जास्त प्रमाणात ओढ देणे आवश्यक बनले आहे. गोव्यात विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य शिक्षणाची मोठी प्रतिभा आहे. त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करून कौशल्य शिक्षणाचे फायदे पटवून देणे आवश्यक आहे. गोवा राज्याचे मुख्यमंत्री व साखळीचे आमदार या नात्याने साखळीतूनच आम्ही ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत गोवाभरातील विद्यार्थी पालकांनी सहभागी होऊन बारावीनंतर आपणास कोणते क्षेत्र फायदेशीर ठरू शकते. याबाबत समुपदेशन तसेच मार्गदर्शन करून घ्यावे. व त्याप्रमाणे क्षेत्र निवडावे, असे आवाहनही मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. यावेळी साई नर्सिंग इन्स्टिट्यूट चे व्यवस्थापक संतोष मुळीक यांचीही उपस्थिती होती.




डिचोली : करियर मेळाव्यातील तज्ज्ञ प्रशिक्षकांसह मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.

# 'कुमार नाईट' एक सुरमई अविष्कार



पणजी : कार्यक्रमाचे उद्घाटन करताना अमिता नायक सलत्री. बाजूला दीपक नार्वेकर, आशा वेलिंगकर, शकुंतला भरणे, रजनी ठाकूर व नीलेश फातर्पेकर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** 'कुटूंब' या सोशल आणि कल्चरल असोशिएशनने अलिकडेच कला अकादमीत आयोजित केलेला आणि प्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार आणि मनोज कुमार यांच्या अभिनयावर आधारित 'कुमार नाईट' हे शिर्षक असलेला सुत्राव्य गीतांचा कार्यक्रम श्रोत्यांच्या भरगच्च उपस्थितीत रंगला. जुन्या काळातील अवीट चाली आणि सुरील्या सजावटीने नटलेल्या कित्येक गाण्यांचा यात समावेश होते.

'कुटूंब'चे नीलेश फातर्पेकर आणि अचलेंद्र अशा वेलिंगकर यांच्या अथक प्रयत्नांनी आजवर, असे सहा सांगितिक कार्यक्रम सादर झाले असून प्रत्येक कार्यक्रमाला संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

प्रमुख पाहुण्या म्हणून अभिनेत्री अमिता नायक सलत्री, जीटीडीसीचे दीपक नार्वेकर, गायिका रजनी ठाकूर, शकुंतला भरणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

गोव्यातील आघाडीचे गायक कलाकार राजेश मडगावकर, समृद्धी चोडणकर, अन्नपूर्णा साखरदांडे, खुशबू हळदणकर, माधवी मडगावकर आणि सागर नाईक या सर्वांनी एका पेक्षा एक हीट गाणी सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रसुग्ध केले. तसेच गौरव साळगावकर, निहाल काणे, सूरजीत थळी, सनम कोचकर, सांतानो कारवालो, रोहन नाईक, गौरिश पैजणकर या प्रसिद्ध वादकांनी अवर्णनीय अशी अचूक सुमधूर अशी साथसंगत करून संपूर्ण कार्यक्रमची उंची वाढविला. अत्यंत उत्कृष्ट आणि बहारदार अशा या कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण असे निवेदन दिनेश तारे आणि तनया कीर्तनी यांनी केले. एकूणच हा संपूर्ण कार्यक्रम रंगतदार ठरला हे विशेष अशा वेलिंगकर यांनी अभार प्रदर्शन केले.